महासागर

पालघर

शनिवार, २१ जून २०२५

# पावसाच्या तडाख्याने मुख्य रस्ता खचला

## वाहन चालकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

**वाडा, दि. २० : प्रतिनिधी**

वाडा -भिवंडी महामार्गावरील नेहरोली येथील पेट्रोल पंपाजवळ सततच्या पावसाने रस्ता खचल्याने याठिकाणी वाहतूक कोंडी होत होत असून यामार्गे प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना जीव मुठीत धरुण प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या एकेरी महामार्गाची तत्काळ दुरुस्ती करून वाहन चालकांना दिलासा द्यावा अशी मागणी वाहनचालक करीत आहेत. गेल्या काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडत असल्याने प्रचंड खड्डे पडून वाडा-भिवंडी महामार्गाची दुरवस्था झाली आहे. यामहामार्गावर नेरोली येथे रस्त्या खचल्याने मोठा खड्डा पडला आहे. यातून निकृष्ट कामाचा प्रत्यय येऊ लागल्याने प्रशासनाची पोलखोल झाली आहे.

आणखी काही दिवस पाऊस जोरदार कोसळत राहिला तर मात्र हा महामार्ग वाहतुकीसाठी बंद होईल, अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय मुंबई- अहमदाबाद महामार्गावर बुधवारपासून वाहतूक कोंडी झाल्याने वाडा-भिवंडी यामार्गे वाहनांची प्रचंड वर्दळ वाढली आहे. त्यामुळे या मार्गावरही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून वाहने कासवाच्या गतीने खड्ड्यांचा अडथळा दूर करत पुढे जात आहेत. याअवजड वाहनांचा लोड घेण्यासारखी महामार्गाची स्थिती नसल्याने येत्या काही दिवसातच हामहामार्ग वाहतूकीसाठी धोकादायक होईल, अशी भिती व्यक्त केली जात आहे.



# मुख्यमंत्र्यांच्या पालघर दौऱ्यानंतर पालकमंत्री एक्शन मोडमध्ये

- जिल्ह्यातील विविध प्रकल्पांचा घेतला आढावा
- प्रकल्पांना गती देण्याच्या यंत्रणांना सूचना



**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नगररचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, नॅशनल हायस्पिड रेल कार्पोरेशन व मुंबई रेल्वे विकास महामंडळ आदी विविध यंत्रणांकडून राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांचा वनमंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी आढावा घेतला. पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी हे सर्व प्रकल्प महत्त्वाचे असून या प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात यावी. यासाठी वन विभाग व जिल्हा प्रशासनाकडून सर्व सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच पालघर जिल्ह्याचा दौरा केला. त्यावेळी त्यांनी पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी आग्रही भूमिका मांडली होती. त्यापार्श्वभूमीवर वनमंत्री तथा पालघरचे पालकमंत्री नाईक यांनी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आढावा बैठक घेतली. त्यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक तथा वन बल प्रमुख शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव, श्री. रामाराव, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुद्गल, पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वसई विरार महापालिका आयुक्त अनिल पवार, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नरेश झिरमुरे, उपसचिव विवेक होशिंग आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी विविध यंत्रणांनी पालघर जिल्ह्यात राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. यामध्ये सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, बाह्यरस्ते विकास योजना, पालघर जिल्ह्यातील विकासकामे, सफाळे/केळवा/माहिम विकास केंद्रे, पालघर विक्रमगडमार्गे समृद्धी महामार्गाला जोडणारा रस्ता, विरार अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन, एमयूटीपी ३ अंतर्गत करण्यात येणारे रेल्वेची कामे आदींचा समावेश होता.

वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग व बुलेट ट्रेन अशा प्रकल्पांमुळे पालघर जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलणार आहे. याबरोबरच इतरही प्रकल्प जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या प्रकल्पांना वनमंत्री म्हणून तसेच जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येणार असल्याचे नाईक यांनी यावेळी सांगितले.

# कासा पोस्ट कार्यालयात बारा हजारांचा आर्थिक अपहार

## 'दैनिक महासागर' वृत्तपत्राच्या बातमीनंतर तातडीने रक्कम परत

**डहाणू, दि. २० : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील कासा पोस्ट कार्यालयात घडलेल्या आर्थिक अपहार प्रकरणाचा अखेर पर्दाफाश झाला असून, 'महासागर' या स्थानिक वृत्तपत्राच्या निर्भीड आणि वस्तुनिष्ठ पत्रकारितेमुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करत ग्राहकाच्या पैश्यांची परतफेड करत रक्कम खात्यात जमा केली आहे. या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली असून, पोस्ट खात्याच्या कार्यप्रणालीवर संशयाची छाया निर्माण झाली आहे.

कासातील रहिवासी किशोर गोवारी यांनी २७ मे २०२५ रोजी आपल्या पत्नीच्या नावाने दोन हजार आणि मुलीच्या नावाने दहा हजार अशी एकूण बारा हजारांची रक्कम कासा पोस्ट कार्यालयात ठेवीच्या स्वरूपात भरली होती. याबाबत पोस्ट मास्तरने त्यांना अधिकृत पावत्याही दिल्या होत्या. नेहमीच्या प्रमाणे ही रक्कम ठेवल्यानंतर गोवारी निश्चिंततेने घरी परतले. मात्र, १८ जून रोजी पोस्ट कार्यालयात चौकशी करण्यासाठी गेल्यानंतर, संबंधित रक्कम खात्यात जमा झालेली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी जबाबदार कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, धक्कादायक बाब समोर आली. सदर व्यवहाराची कुठेही नोंदच झालेली नव्हती. म्हणजेच, रक्कम जमा केली गेली होती, पावत्या देण्यात आल्या होत्या, पण संबंधित खात्यात रक्कम जमा नव्हती.

या धक्कादायक प्रकाराची माहिती किशोर गोवारी यांनी 'दैनिक महासागर'च्या प्रतिनिधींना दिली. याबाबत संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यात आली व गंभीर दखल घेत ''पोस्ट मास्तरचा ग्राहकांच्या पैशांवर डल्ला'' या ठळक मथळयाखाली १९ जून रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आली. या वृत्तानंतर प्रशासनात खळबळ उडाली. टपाल खात्याने तातडीने अंतर्गत चौकशी सुरू केली, तर स्थानिक पोलिस प्रशासनानेही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तपास सुरु केला. गुरुवारी, १९ जून रोजी कासा पोस्ट कार्यालयाने ही बाब गुपचूप मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे व्यवहार प्रक्रिया पुढे ढकलली गेली. अखेर गुरुवारी दुपारनंतर गोवारी यांच्या पत्नीच्या खात्यात दोन हजार आणि मुलीच्या खात्यात दहा हजार अशी एकूण बारा हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. माध्यमांनी आवाज उठवला नसता, तर आमचे पैसे परत मिळाले नसते, अशी प्रतिक्रिया किशोर गोवारी यांनी दिली.


महासागर
पोस्ट मास्तरचाच ग्राहकांच्या पैशांवर डल्ला
कासा पोस्ट कार्यालयात आर्थिक गैरव्यवहार
पोस्ट खात्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

याप्रकारामुळे संपूर्ण कासा परिसरात नागरिकांमध्ये संताप आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेक नागरिकांनी आपल्या खात्यांची तपासणी सुरू केली असून, याआधीही अशा प्रकारचे व्यवहार गुपचूप गिळंकृत झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोस्ट कार्यालयाच्या व्यवस्थेवर आणि कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि यंत्रणेतील अपारदर्शकता दूर व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, जर सामान्य नागरिकांनी सजग राहून प्रश्न विचारण्याची हिंमत दाखवली आणि माध्यमांनी निर्भयपणे त्याचा पाठपुरावा केला, तर कोणतीही यंत्रणा सुधारू शकते.

# टायर रिसायकलिंग कंपन्या शेतकऱ्यांच्या मुळावर

**वाडा, दि. २० : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील वडवली ग्रामपंचायत हद्दीतील टायर रिसायकलिंग कंपन्या मुसारणे पाडा, चिंचघर पाडा या दोन गावातील शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्या आहेत. येथील परंपरागत वहिवाटीचा असलेल्या नैसर्गिक नाल्यात टायर कंपनी मालकाने संरक्षक भिंत बांधल्याने नाल्याचे संपूर्ण पाणी भात शेतीत गेले असून पहिल्याच पावसात संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे ही शेती नापीक होणार आहे या दोन गावातील शेतकरी आता देशोधडीला लागणार आहेत. त्यामुळे प्रशासनाने या टायर रिसायकलिंग कंपन्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे. नैसर्गिक नाल्यामध्येच बांधकाम केल्याने हे संपूर्ण पाणी भात शेतीत जाऊन शेतीची नासाडी होणार असल्याने या शेतकऱ्यांचे संसार उघड्यावर पडणार आहेत. त्यामुळे या कुटुंबीयांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बांधकामामुळे नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदलून पाण्याचा मार्ग बदलला आहे. नालाच अरुंद केल्याने पूर्वापार चालत आलेले नाल्याचे पाणी आता निघत नाही. त्यामुळे पूर्णपणे शेतजमिनीची नासाडी होणार आहे.

> या कंपन्यांमधून निघणारे टाकाऊ रसायन हे थेट नाल्यात सोडले जात असल्याने पाणी अधिक दूषित झाले असून पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंधी येत आहे. त्यामुळे या गावातील नागरिक व पशुपक्ष्यांचे आरोग्य व भात शेतीही धोक्यात आली आहे. प्रशासनाने याची तत्काळ दखल घेऊन नाल्यात उभारलेली संरक्षण भिंत तोडून या प्रदूषणकारी टायर कंपन्यांविरोधात कारवाईचा बडगा उभारावा, अन्यथा शेतकरी तीव्र आंदोलन छेडतील.
>
> **- प्रवीण पाटील, शेतकरी, चिंचघर पाडा**
>
> याप्रकरणी मंडळ अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याच्या सूचना दिल्या जातील. त्यांच्याकडून वस्तुस्थितीची पाहणी झाल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल.
>
> **- भाऊसाहेब अंधारे, तहसीलदार (वाडा)**

धक्कादायक बाब म्हणजे याकंपन्यांमुळे आधीच प्रदुषणाचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच याच नाल्यात रसायन मिश्रित दूषित पाणी सोडले जात आहे. त्यामुळे नागरिकांसह गुराढोरांचेही अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे ही संरक्षक भिंत तोडून नैसर्गिक नाला पूर्ववत करून नागरिकांच्या आरोग्यास हानिकारक अशा या टायर कंपन्या इतरत्र हलविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. टायर रिसायकलिंग कंपन्यातून निघणाऱ्या प्रचंड धुरामुळे येथील ग्रामस्थांना श्वसनाचे आजार जडू लागले आहेत. रात्रंदिवस उग्र वासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार अर्ज विनंती करूनही अधिकाऱ्यांकडून जाणून-बुजून कानाडोळा केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.

# वांगणी-शीळ गावात परप्रांतीय कामगाराचा संशयास्पद मृत्यू: सखोल चौकशीची मागणी

**बदलापूर, दि.२०: प्रतिनिधी**

अंबरनाथ तालुक्यातील वांगणी जवळील शीळ गावामध्ये एका परप्रांतीय कामगाराचा संशयास्पद मृत्यू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना दि. १७ जून रोजी घडली. लतू दिघंत दत्ता (वय-२४) असे मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव असून, त्याला दवाखान्यात नेण्यापूर्वीच मृत घोषित करण्यात आल्याने मृत्यूचे गूढ वाढले आहे. जखमी व्यक्तीस जवळच्या बदलापूर शहरात दाखल करण्याऐवजी नेरळ येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी भरती केल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. नेरळ पोलिसांनी या प्रकरणी पुढील तपास वर्ग करणार असल्याचे सांगितले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ जून रोजी सकाळी अंबरनाथ तालुक्यातील शीळ गाव परिसरात एका परप्रांतीय कामगाराचा मृत्यू झाला. लतू दिघंत दत्ता (वय २४ वर्ष) असे संशयास्पद मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. या घटनेची माहिती स्थानिक पोलीस स्टेशनला न देता मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावण्याच्या हेतूने दुसऱ्या हद्दीतील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, रुग्णालयाने त्याला आणण्यापूर्वीच मृत घोषित केले होते आणि याची माहिती त्या खासगी रुग्णालयाने नेरळ पोलीस स्टेशनला दिली. त्या मृतदेहाचे नेरळ पोलीस स्टेशनमार्फत शवविच्छेदन करण्यात आले.

याबाबत महसूल विभाग, पोलीस विभाग आणि आरोग्य विभाग यांना खुलासा विचारला असता, या तिन्ही विभागांनी हात वर केले आहेत. याबाबत महसूल विभाग खुलासा करणार की, सदर प्रकरण सहजपणे दडपले जाईल, याबाबत सखोल चौकशीची मागणी होत आहे. यातून मोठा गंभीर प्रकार उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# आता एफएसआयसोबत तितकाच टीडीआरही घ्यावा लागणार

## कुळगांव नगरपालिकेचा टीडीआरला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय

**बदलापूर, दि.२०: प्रतिनिधी**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने आता बांधकाम परवानगीं प्रकरणात एफएसआय सोबत तितकाच समान टीडीआर घेण्याचे विकासकांना सक्तीचे केले आहे.

बांधकाम परवानगी घेताना मुळ चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात एफएसआय, प्रिमीयम एफएसआय आणि त्यावर अनुज्ञेय असलेला सहायक चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात अँसिलरी एफएसआय वापरला जातो. अशावेळी हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआरची मागणी केली जात नाही. त्यामुळे शहरात टीडीआरच्या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणे कमी झाली असून त्याचा विकास योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे, अशी बाब नगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे. तसेच टीडीआर निर्मिती थंडावली असून त्यासाठी कुळगांव बदलापूर नगरपरिषद प्रशासनाने आता दि.०१/०७/२०२५ पासून सर्व बांधकाम परवानगीसाठी( पुनर्विकास प्रकल्प वगळता) एफएसआय सोबत तितकाच समान टीडीआर घेण्याचे सक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. याबाबतचा आदेश नुकताच कुळगांव बदलापूर नगरपरिषद प्रशासनाने जाहीर केला आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीचा बांधकाम क्षेत्राला मोठा फायदा झाला. यात अनेक मुद्द्यांवर सुतुत्रता आली. या नियमावलीनुसार रहिवासी बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये कमाल बांधकाम क्षमतेच्या मर्यादेत, वापरलेला बेसिक एफएसआय, प्रिमियम एफएसआय आणि टिडीआर या सर्वांवर ६० टक्के अँसिलरी एफएसआय घेण्याची तरतूद आहे. मात्र बऱ्याचशा बांधकाम परवानगी प्रकरणात मुळ एफएसआय आणि प्रिमियम एफएसआय तसेच त्यावर अनुज्ञेय असलेला अँसिलरी एफएसआय वापरुन बांधकाम परवानगी प्रकरणे सादर केली जातात. अशा प्रकरणात टीडीआर वापरुन अतिरिक्त एफएसआय मागितला जात नाही. त्यामुळे नगरपरिषद हद्दीतील टीडीआरचे महत्व कमी झाले असून या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणे कमी झाल्याची बाब नगरपरिषद प्रशासनाच्या निदर्शनात आली आहे. त्यामुळे शहराच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीवर फरक पडत असल्याने विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरक्षणाखालील व विकास योजना रस्त्याखालील जमिनी टीडीआरच्या माध्यमातून संपादित करणे आवश्यक आहे. विकास योजना रस्त्याखालील जमिनीच्या मालकांनी स्वतः पुढाकार घेऊन टीडीआरच्या मोबदल्यात या जमिनी नगरपालिकेला हस्तांतरीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे या टीडीआरच्या निर्मितीला आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्या वापराची सक्ती करण्याचा निर्णय कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने घेतला आहे.त्यामुळे नगरपरिषदेचा हा निर्णय बांधकाम व्यावसायिक कसा घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीचे नग्नावस्थेतील फोटो वायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिचे अश्लिल फोटो सोशल मिडीयावर वायरल करणाऱ्या तरुणाविरोधात बलात्कारासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून पेल्हार पोलिसांनी त्याला अटक केली आहे. आरोपीने मुंबईत राहणाऱ्या पिडीत १७ वर्षीय मुलीला वसईतील आपल्या घरी बोलावले होते. यावेळी त्याने तिच्यासोबतच अश्लिल फोटो वायरल करण्याची धमकी देत तिचे पुन्हा नग्नावस्थेतील फोटो काढले. त्यानंतर सदरचे फोटो वायरल करण्याची धमकी देऊन तिच्यासोबत जबरदस्तीने शारिरिक संबंध केले. इतकेच नाही तर सदरचे फोटो सोशल मिडीयावर वायरल करून असिड फेकण्याची धमकी दिली होती. त्यामुळे त्रस्त् झालेल्या पिडीतेने मुंबईतील एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गुन्हा पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने एमआयडीसी पोलिसांनी तो पेल्हार पोलिस ठाण्यात वर्ग केल्यावर पोलिसांनी रितसर गुन्हा दाखल करून तरुणाला अटक केली आहे.

# पत्नीसह मुले सोडून गेल्याने आत्महत्या

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

पत्नी आणि मुले सोडून गेल्याने एका इसमाने नैराश्यात येऊन नालासोपारा येथील मोरेगाव तलावात आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दीपकचंद्र दत्तानी (६०) असे त्या इसमाचे नाव आहे. मोरेगाव तलावात दीपकचंद्र दत्तानी यांचा मृतदेह आढळून आला होता. यावेळी तिथे उपस्थित असलेल्या एका महिलेने दीपकचंद्रचा मृतदेह ओळखला. त्यानंतर दीपकच्या आत्महत्येचे गुढ उकलले. दीपकचंद्र आपली पत्नी आणि मुलांसह मोरेगावातच राहत होते. मात्र, त्यांना दारु पिण्याचे व्यसन असल्याने पत्नी आणि मुले त्रासली होती. दीपकचे दारूचे व्यसन सुटत नसल्याने त्रासलेल्या पत्नी आणि मुले त्याला एकटे सोडून दुसरीकडे निघून गेली होती. तेव्हापासून दीपकचंद्र नैराश्यात होता. त्यातूनच त्याने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# अट्टल रिक्षाचोर पोलिसांच्या जाळ्यात

## सात गुन्ह्यांची उकल करत रिक्षाही जप्त



**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

वालीव पोलीस ठाण्यात रिक्षा चोरीच्या दाखल असलेल्या गुन्ह्यांचा समांतर तपास करत असलेल्या गुन्हे शाखा-२ वसईच्या पथकाच्या हाती दोन रिक्षा चोर लागले. त्यातील एक आरोपी अट्टल रिक्षाचोर असल्याचे उजेडात येऊन रिक्षाचोरींच्या सात गुन्ह्यांची उकल होऊन सातही रिक्षा पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

मुंबईतील कुर्ला येथील रिक्षाचालक मदन लालदुधनाथ यादव यांनी १४ जूनला दुपारी वसई पूर्वेकडील फादरवाडी नाक्याजवळ आपली रिक्षा उभी करून कामानिमित्त निघून गेले होते. तासाभरात परतलेल्या यादव यांना आपली रिक्षा चोरीला गेल्याचे दिसून आल्यावर त्यांनी वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर वालीव पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात रिक्षाचोरीचा गुन्हा दाखल केला होता.

यागुन्हाचा समांतर तपास गुन्हे शाखा-२ वसईचे पथक करत होते. पथकाने घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून तपास केल्यानंतर आरोपी निष्पन्न केले. त्यानंतर पथकाने ईक्बाल उर्फ अकबाल अजिज खान (५७, रा. भायखळा झोपडपट्टी, भायखळा पश्चिम, मुंबई) आणि सय्यदअली बकरीद्दीन नाई (३५, रा. प्रगतीनगर, नालासोपारा पूर्व) यांना मदन यादव यांच्या चोरलेल्या रिक्षासह अटक केली.

यातील मुख्य आरोपी ईक्बाल उर्फ अकबाल अजिज खान या सराईत गुन्हेगार असल्याचे उजेडात आले असून त्याच्या अटकेनंतर वालीवसह गोरेगाव, सांताक्रुझ, विलेपार्ले, घाटकोपर, खैरवाडी, अंधेरी यामुंबईतील पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या रिक्षाचोरींची उकल झाली आहे. यागुन्ह्यात चोरलेल्या सर्व सातही रिक्षा हस्तगत करण्यातही पोलिसांना यश आले आहे.

अधिक तपासात ईक्बाल उर्फ अकबाल अजिज खान याच्याविरोधात भांडुप, वाकोला, पार्कसाईड, दिंडोशी, दिंडोशी, दिंडोशी, कुर्ला, साकीनाका, अंबोली, बोरीवली, घाटकोपर, ओशिवरा यामुंबईतील पोलीस ठाण्यात बारा गुन्हे दाखल असल्याचेही उजेडात आले. पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा -२ वसई युनिटचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपाना पाटील, सागर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अजित गिते, रमेश भोसले, सहाय्यक फौजदार संजय नवले, मुकेश पवार, चंदन मोरे, रविंद्र पवार, हवालदार प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, राहुल कर्पे, प्रशांतकुमार ठाकूर, अनिल साबळे, राजकुमार गायकवाड, प्रतिक गोडगे, संतोष चव्हाण यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# आदिवासी शिक्षकांच्या प्रश्नांना अधिवेशनात वाचा फोडू

## आमदार हरिश्चंद्र भोये यांची ग्वाही



**जव्हार, दि.२०: प्रतिनिधी**

मी सुद्धा आदिवासी भागात शिक्षण क्षेत्रात काम करणारा कार्यकर्ता आहे. आदिवासी भागात कुडाची शाळा बांधण्यापासून ते शाळेची इमारत आणि इतर सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी मी संघर्ष केला आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आणि पुढची पिढी घडवण्यासाठी केवळ शिक्षकच जबाबदार असतो. म्हणून शिक्षकांचे विविध प्रश्न शासनाने प्राधान्याने सोडवले पाहिजेत. मी सर्वतोपरी मदत करण्यास तयार असून विधिमंडळात मी आदिवासी शिक्षकांच्या प्रश्नांना नक्की वाचा फोडीन, अशी ग्वाही आमदार हरिश्चंद्र भोये यांनी जव्हार येथे बोलताना केले. जव्हार येथे महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटनेचे (मस्त) राज्यस्तरीय अधिवेशन पार पडले. विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक शिक्षक-प्राध्यापक या अधिवेशनास उपस्थित होते. आदिवासी भागात काम करणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एक स्तर वेतन पद्धतीबाबत तसेच सातव्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन देण्यासंदर्भात आणि प्राध्यापकांच्या इतर मागण्यांबाबत या अधिवेशनात चर्चा करण्यात आली. त्याची दखल घेत आमदार भोये यांनी याप्रश्नांवर लक्ष घालून ते तडीस नेऊ, अशी ग्वाही दिली. शिक्षक संघटना बऱ्याचदा केवळ शहरी भागातल्या शिक्षकांच्या प्रश्नांबाबत चर्चा करतात. मात्र, आदिवासी भागातले अनेक प्रश्न वर्षानुवर्ष जसेच्या तसे आहेत. आदिवासी भागातील शिक्षकांची एकजूट निर्माण करून त्यांच्या एक स्तर वेतनाचा विषय असो किंवा सातव्या वेतन आयोगाच्या संदर्भातील अनेक त्रुटी असो. आपली संघटना आता शासनाबरोबर या प्रश्नांच्या संदर्भात चर्चा करणार आहे. हे प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करूया. आदिवासी भागातील लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी खासकरून हे अधिवेशन जव्हार येथे घेण्यात आले आहे, असे मस्त संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजय पवार आपल्या प्रास्ताविकात सांगितले. या अधिवेशनाचे फलित म्हणजे आदिवासी भागातील सर्व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. डॉ.निर्मला पवार, डॉ.नामदेव महाले,डॉ. पांडुरंग गावडे,डॉ. दीपक गायकवाड, डॉ. अजय कांबळे, डॉ. काकुळते यांची समयोचित भाषणे झाली. अधिवेशन यशस्वी होण्यासाठी संघटनेचे खजिनदार डॉ संदेश डोंगरे, डॉ. नारायण पाटील, अब्दुल चौधरी,डॉ. मुनिष पांडे,डॉ दिलीप काळुसे, डॉ. बसवेश्वर पंडागळे, डॉ.सुनील दत्त गोडसे,डॉ.संतोष धामोने, प्रा.बोरसे मॅडम, यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शशिकांत माघाडे यांनी केले.

# रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्याचे काम सुरु

**भाईंदर, दि. २० : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर शहरात काशिमीराकडून दहिसर चेकनाकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ठाकूर मॉलच्या पुढे काही अंतरावर एक्सप्रेस हायवे येथील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य झाले होते. मागील काही दिवसांपासून पाऊस सुरु झाल्याने वाहन चालक यांना रस्त्यावर प्रवास करताना मोठ्या अडचणीना समोर जावे लागत होते. मात्र, मिरा भाईंदर शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा व अधिकाऱ्यांना दिलेले २४ तासाचे अल्टिमेटम यामुळे काही तासांच्या आतच दहिसर चेकनाका हायवेवरील रस्त्याचे काम तत्काळ सुरु करण्यात आले आहे.

दहिसर चेकनाका एक्सप्रेस हायवे येथील रस्त्यावर अतिशय मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले होते. याच खड्ड्यांमुळे तेथे मोठ्या प्रमाणांवर वाहतूक कोंडी निर्माण होते आणि याचा नाहक त्रास नागरिकांना होत होता. याबाबत मनसेने आक्रमक पवित्रा घेतला होता आणि सदर ठिकाणचे खड्डे येत्या २४ तासात बुजवले नाही तर त्याच खड्ड्यात संबंधित अधिकारी यांना लोळवण्यात येईल, असा इशार मनसेचे मिरा भाईंदर शहर अध्यक्ष संदीप राणे यांनी दिला होता. त्यानंतर काही तासातच दहिसर चेकनका एक्सप्रेस हायवेवरील रस्त्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले असून खड्डे बुजवण्यात येत आहेत. त्यामुळे आता वाहन चालक यांना त्रास सहन करावा लागणार नाही.

# विरारमध्ये धो-धो पावसात डांबरीकरण

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**



वसईच्या भाबोळा येथे रात्रीच्यावेळी भरपावसात वसई विरार महापालिकेकडून डांबरीकरण केले जात असल्याचे उजेडात आल्यानंतर आता विरारमध्ये देखिल डांबरीकरण करून रस्त्यावर खड्डे बुजवण्याचे काम भरपावसात केले जात असल्याची दुसरी धक्कादायक बाब उजेडात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे विरार शहरप्रमुख यांनी पंधरा दिवसांपूर्वी विरार पूर्वेकडील मनवेलपाडा परिसरात वसई विरार महापालिकेकडून रस्त्यावरील खड्डयांमध्ये डांबराच्या जागी माती टाकली जात असल्याचे काम बंद पाडले होते. सदरचे काम थांबवून जाधव यांनी योग्य पध्दतीने काम करण्यास अभियंता सतीशकुमार सुर्यवंशी यांना भाग पाडले होते. मात्र, सुर्यवंशी यांच्या आदेशाने ठेकेदार रोशन जाधव यांनी पुन्हा चुकीच्या पद्धतीनेच काम केल्याची तक्रार जाधव यांनी केली होती. महापालिकेचे अधिकारी ठेकेदारांच्या संगनमताने चुकीच्या पध्दतीनेच काम करत असल्याचा आणखी एक धक्कादायक प्रकार जाधव यांनी समोर आणला आहे. विरार पूर्वेकडील साईनाथ नगर येथे मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरु आहे. धक्कादायक बाब म्हणजे धो-धो पाऊस कोसळत असताना ठेकेदारांची माणसे पाण्याने भरलेल्या खड्ड्यात डांबर टाकल होते.

इतकेच नाही तर डांबर दाबण्यासाठी कोणतेही यंत्र न वापरता ठेकेदाराचे मजूर डांबर खड्यात चक्क पायानेच दाबत असल्याचा व्हिडीओ जाधव यांनी काढलेल्या व्हिडीओत दिसत आहे. सुर्यवंशीसारखे अधिकारी ठेकेदारांना हाताशी धरून अशा पद्धतीने चुकीचे कामे करून महापालिकेची तिजोरी लुटत आहेत. यादोन्ही प्रकरणीत सुर्यवंशी यांच्या आदेशावरुन ठेकेदार रोशन जाधव यांनी काम केलेले आहे. रस्त्यावरील खड्डे बुजवण्याच्या कामात मोठा गैरप्रकार सुरु असून त्यातून महापालिकेचे पैसे लाटले जात आहेत. म्हणूनच सुर्यवंशी आणि ठेकेदार रोशन जाधव यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जाधव यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांना पालकमंत्र्यांकडेही तक्रार केली आहे.

# सिलेंडरच्या स्फोटात कारखाना उध्वस्त

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

वसई पूर्वेच्या नवघर औद्योगिक वसाहतीत एका कारखान्यात गुरुवारी सकाळी सव्वा आठच्या सुमारास भीषण स्फोट झाल्याची घटना घडली आहे. यात कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झाली नसली तरी औद्योगिक गाळ्याचे व साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



वसई पूर्वेच्या नवघर येथील औद्योगिक वसाहतीत मनीष इंडस्ट्री आहे. या इंडस्ट्री नंबर १ मधील पहिल्या "मजल्यावरील गाळा नंबर ११४ मध्ये एका सिलेंडर बाटल्याचा स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की गाळयाचे ग्रील, सज्जे उडून समोरील इस्टेट मनीष २ वर जाऊन धडकले. शेजारील ११३ नंबर तसेच इतर गाळयांचे ही अतोनात नुकसान झाले आहे. स्थानिकांनी या घटनेची

माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या अग्नीशमन दलाच्या जवानांनी गाळयात अडकून पडलेल्या पाच जणांची सुखरूप सुटका केली.

या स्फोटात एक जण किरकोळ जखमी झाला आहे. या घटनास्थळी पोहचून शिवसेना शाखा प्रमुख गणेश पाटकर यांनी व आजुबाजूच्या गाळा धारकांनी सहकार्य केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली आहे. सदर इमारतीत जाणे सद्या धोक्याचे आहे.कारण सज्जे, स्लॅब, इतकेच काय तर भिंती देखील हलल्या आहेत. ज्या कोसळण्याची पूर्ण शक्यता असल्याचे माजी नगरसेविका किरण चेंदवणकर यांनी सांगितले.

# देहविक्री व्यवसायातील महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता महानगरपालिकेचा मदतीचा हात

**भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी**




भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने महिला बाल कल्याण योजनेंतर्गत देह विक्री व्यवसायातील महिला व मुलींना त्या क्षेत्रातून पुर्णतः बाहेर पडून सक्षम होणेकरिता त्यांना रोजगार उपलब्ध करुन, त्यांच्या पुर्नवसनाची योजना आखण्यात आली होती. या योजनेंगर्त सदर महिलांना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या हस्ते दिव्याकरिता आवश्यक असणाऱ्या फुलवाती बनविणाऱ्या मशिनचे वाटप गुरुवारी करण्यात आले.दरम्यान मनपा कार्यक्षेत्रातील हनुमान टेकडी परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांचा परिवर्तन महिला बचत गट, खदान रोड, हनुमान टेकडी, भिवंडी यांना त्यांच्या विनंतीनुसार महानगरपालिकेने ८ फुलवाती बनविणाऱ्या मशीन पुरविल्या आहेत. या मशीनमुळे या सर्व महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होऊन त्या स्वावलंबी होऊ शकतील. आता सुरू होणारे सणवार, उत्सव या कालावधीमध्ये दिव्याच्या फुलवातींना मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे या महिलांना चांगल्या प्रकारे रोजगार प्राप्त होऊन त्यांना आर्थीक लाभ देखील मिळू शकतो. या महिलांचा बचत गट हा श्री साई सेवा संस्था या संघटनेच्या मार्गदर्शनाखाली काम करुन फुलवातींचे उत्पादन करणार आहे. या महिलांकडून उत्पादन केलेल्या फुलवातींची खरेदी शहरातील नागरीकांनी करुन त्यांच्या कार्यास हातभार लावावा अशी अपेक्षा श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग यांनी केली. तसेच आयुक्त अनमोल सागर यांनी देखील अशाच प्रकारचा विश्वास व्यक्त करुन या बचत गटांना मशिनचे वाटप केले आणि शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त (समाज कल्याण) विक्रम दराडे,सहायक आयुक्त (समाज कल्याण) शैलेश दोंदे, श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग, परिवर्तन महिला बचत गटाच्या सदस्य आणि समाज कल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दुचाकी चोरणाऱ्या चोरट्याला अटक

**भाईंदर, दि. २० : प्रतिनिधी**



चोरीला गेलेल्या एका दुचाकीचा तपास करताना भाईंदर पोलिसांच्या दुचाकी चोरणारा तरुण चोरटा हाती लागला. बसंत तुषार ढाल ( वय १९, रा. शिवमती बिल्डींग, उत्तन रोड, भाईंदर पश्चिम) असे त्याचे नाव आहे. चौकशीत दोन गुन्ह्यांचीही उकल झाली. ३० मे २५ रोजी संध्याकाळी भाईंदर पूर्वेकडील नाना-नानी पार्क येथे ठेवलेली दुचाकी चोरीला गेल्याचा गुन्हा भाईंदर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. यागुन्हयाचा तपास करत असलेल्या भाईंदर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन कौशल्यपूर्ण तपास करत आरोपीची ओळख पटवून फोटोही मिळवला होता. त्यानंतर बातमीदाराच्या मदतीने पोलिसांनी बसंत ढालला त्याच्या राहत्या घरातून अटक केली. यावेळी त्याने चोरलेली दुचाकीदेखिल हस्तगत करण्यात आली. अधिक चौकशीत त्याने दुचाकी चोरीचे दोन गुन्हे केल्याचेही उजेडात आले. त्यातील मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे. पोलीस उपायुक्त प्रकास गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त दिपाली खन्ना यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक महेंद्र निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गोवले, अर्जून जाधव, हवालदार सुशील पवार, सलमान पटवे, राजेश श्रीवास्तव, के.आर. पवार, रामनाथ शिंदे, राहुल काटकर, श्रीराम वीर, चेतन गोरे, ओंकार पाठक यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# शालेय शिक्षणात तिसरी भाषा सक्तीची या शासन निर्णयाची मनसे कडून होळी

**उल्हासनगर, दि. २० : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने १७/०६/२०२५ रोजी शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण - २०२५ / प्र.क्र. ९४/एस.डी.-४ दिनांक १६ एप्रिल २०२५ शासन शुद्धीपत्रक काढून महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागात त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु आपल्या महाराष्ट्राच्या शिक्षण विभागाला किंवा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना ३ ऱ्या भाषेची खरंच गरज आहे का, याचा विचार सरकार करतांना दिसत नाही. फक्त दिल्ली हुन आदेश आला म्हणून महाराष्ट्रातील १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याच काम सरकार करत आहे , असा आरोप करीत प्रांत कार्यालया बाहेर मनसेचे जिल्हा अध्यक्ष बंडु देशमुख व शहर अध्यक्ष संजय घुगे यांच्या नेतृत्वाखाली शासन आदेशाची होळी करून प्रांतअधिकारी ( SDO) विजयानंद शर्मा यांना निवेदन देण्यात आले आहे . दरम्यान जबरदस्तीने हा शासन निर्णय लागू करून विद्यार्थ्यांवर तिसरी भाषा लादली जाणार असेल,तर हे खपवून घेतलं जाणार नाही.असा इशारा देत महाराष्ट्रात कोणत्याही परिस्थितीत हिंदी भाषा लादू दिली जाणार नाही. त्रिभाषा सूत्राचा राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी काहीही संबंध नसून हा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे .हा शासन निर्णय तात्काळ रद्द न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा मनसे कडून देण्यात आला आहे .यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सचिन कदम, जिल्हा अध्यक्ष बंडू देशमुख, मनविसे जिल्हा अध्यक्ष धनंजय गुरव, उपजिल्हा अध्यक्ष शैलेश शिर्के, प्रदीप गोडसे,शहर अध्यक्ष संजय घुगे, मनविसे शहर अध्यक्ष वैभव कुलकर्णी, शहर संघटक अशोक गरड,मनसेचे उपशहर अध्यक्ष सचिन बेंडके,मुकेश शेटपालांनी ,रवी पाल ,शैलेश पांडव वाहतूक सेनेचे शहर संघटक काळू थोरात, रस्ते आस्थापनाचे मैनऊद्दीन शेख, विभाग अध्यक्ष देवा तायडे, अक्षय ठाकूर ,मोहित बेहराणी, यांच्यासह निलेश शिंदे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप



**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

विरारच्या दैवज्ञ -सोनार ज्ञाती समाजाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पेन व गोड खाऊचे वाटप करण्यात आले. बोळींज जिल्हा परिषदेच्या शाळेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजातील उद्योजक चंद्रसेन धोंडे, दिनेश गिरधर, ज्येष्ठ समाजसेविका सुचित्रा पितळे, माजी नगरसेवक नितीन मुळे, अजित नाईक, संस्थेचे अध्यश्र विजयकुमार हाटकर, उपाध्यक्ष शशिकांत पावसकर, कार्याध्यक्ष जितेंद्र सत्पाळकर, सेक्रेटरी मुकेश गिरधर, खजिनदार सानिका पितळे, उपखजिनदार कुंदन क्षीरसागर, कार्यकारिणी सदस्य संजय पोतदार, किशोर पितळे, ज्ञाती भगिनीं सौ. पोतदार, ज्योती वगळ, मुख्याधापिका मृणाली पाटील, कु. गिरधर, शरद गिरधर, मेहुल गिरधर, .कुंदन क्षीरसागर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश गिरधर यांनी केले. आभारप्रदर्शन किशोर पितळे यांनी केले.

# वीज ग्राहकांनी टोरंट पॉवरचे अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम भरु नये - खा.बाळ्या मामा

**भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी**



टोरंट पावर कंपनीने आकारलेले अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम भिवंडीतील नागरिकांनी भरू नये,असे आवाहन भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळया मामा यांनी गुरुवारी नागरिकांना केले आहे.शहर व ग्रामीण भागात वीज पुरवठा करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीने वीज ग्राहकांना अतिरिक्त डिपॉझिट रक्कम भरण्याच्या सूचना केल्या आहेत. ही डिपॉझिट रक्कम दीड हजार रुपयांपासून ते साडेपाच हजार रुपयांहून अधिक आहे. लवकरात लवकर ही डिपॉझिट रक्कम भरण्याच्या सूचना व मोबाईल मेसेज टोरंट पावर कंपनीकडून वीज ग्राहकांना पाठवण्यात आले आहेत. विज बिल भरतानाच हैराण झालेल्या वीज ग्राहकांना आता पुन्हा डिपॉझिटच्या नावाने हजारो रुपये वीज वितरण कंपनीला द्यावे लागणार असल्याने वीज ग्राहकांमध्ये असंतोष पसरला आहे.यासंबंधीच्या तक्रारी खासदार बाळया मामा यांच्याकडे आल्या असता या संदर्भात भिवंडी शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी टोरंट पॉवर कंपनीने आकारलेला अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम भरू नये, टोरंट ने आकारलेली ही जादा डिपॉझिट रक्कम पूर्णता बेकायदेशीर असून जर टोरेंट पॉवर कंपनीने वीज ग्राहकांना त्रास दिला अथवा डिपॉझिट भरण्यासाठी तगादा लावला तर नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन देखील खासदार बाळया मामा यांनी नागरिकांना केले आहे.

# हरित ऊर्जा क्षेत्रात 7 लाखांवर रोजगाराच्या संधीमुळे ‘सौर’ कौशल्य विकास प्रशिक्षणाला वेग देणे गरजेचे

## महावितरणचे सीएमडी लोकेश चंद्र यांचे प्रतिपादन

**मुंबई, दि. २० : प्रतिनिधी**




राज्यात प्रामुख्याने सौर ऊर्जेमुळे पारंपरिक ऊर्जेच्या परिवर्तनाचा वेग वाढला आहे. येत्या पाच वर्षांत वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत आणखी ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेची राज्यात भर पडणार आहे. यासह सौर ऊर्जेच्या विविध योजनांमुळे हरित ऊर्जेच्या क्षेत्रात सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रूपयांची गुंतवणूक तसेच सात लाखांवर रोजगारांची निर्मिती होणार आहे. त्यामुळे कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळासाठी बेरोजगार महिला व युवकांना प्रशिक्षण देणे व त्याचा वेग वाढवत नेणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नाशिक येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र सौर कौशल्य कार्यक्रम अंतर्गत महावितरण, आशियाई विकास बँक व मिटकॉन यांच्या संयुक्त सहकार्याने एकलहरे (नाशिक) येथील मुख्य प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रामध्ये सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या पहिल्या वर्गाचे उद्घाटन लोकेश चंद्र यांच्याहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे यांची उपस्थिती होती.

महावितरणमध्ये शिकाऊ उमेदवार (अप्रेंटिस) असलेल्या ५७ युवतींना या प्रशिक्षणात प्रथम संधी देण्यात आली आहे. सहा दिवसीय प्रशिक्षणात त्यांना प्रामुख्याने सौर पॅनेल बसवणे, दुरुस्ती करणे, नियमित देखभाल व इतर प्रशिक्षण देण्यात येत आहे. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधला. सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या राज्यातील पहिल्या तुकडीमध्ये सर्वच प्रशिक्षणार्थी म्हणून महिलांना संधी देण्यात आली याचा त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. भविष्यात हरित ऊर्जेची गुंतवणूक व रोजगाराच्या संधी वेगाने वाढत जाणार आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी आशियाई विकास बँक, महावितरण व मिटकॉन यांचा संयुक्त प्रशिक्षणाची योजना अतिशय स्वागतार्ह आहे असे त्यांनी सांगितले.

लोकेश चंद्र म्हणाले, राज्यात विजेची स्थापित क्षमता सध्या ३६ हजार मेगावॅट आहे. त्यात सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची भर पडणार आहे. त्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यात सौर ऊर्जेचा सर्वाधिक वाटा राहणार आहे. जगातील सर्वांत मोठा १६ हजार मेगावॅटचा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प राज्यात मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मधून पूर्णत्वास जात आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेद्वारे दिवसा वीजपुरवठा मिळविण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण होत आहे. यासोबतच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप आदीमुळे सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे, असे त्यांनी सांगितले.

संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार म्हणाले की, महावितरणकडून पहिल्या टप्प्यात ४ हजार जणांना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यात किमान ३० टक्के महिला प्रशिक्षणार्थींचे प्रमाण असेल असे नियोजन आहे. सोबतच राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यास वेग देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशियाई बँकेचे सल्लागार प्रद्योत मुखर्जी यांनी केले. मिटकॉनचे उपाध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. कार्यक्रमाला मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) अरविंद भादिकर, मुख्य अभियंता सुंदर लटपटे, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन सौ. शिल्पा फसे यांनी केले.

# नामांकित ब्रँडेड कंपनीच्या घड्याळांची कॉपी करणाऱ्या दुकानदारावर गुन्हा दाखल

**भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी**

विविध नामांकित ब्रँडेड कंपनींच्या घड्याळांची हुबेहूब नक्कल व रंगसंगती करून ती दुकानात साठवून विक्रीसाठी ठेवून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या दुकानदाराच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात कॉपीराईट कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.राजेश फतनदास दादवानी (५२ रा.उल्हासनगर,कल्याण) असे गुन्हा दाखल झालेल्या मालकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गौरव श्यामनारायण तिवारी (३७) हे दिल्लीतील एसएनजी सालीशिटर एलएलपी कंपनी लिमिटेड चे अधिकृत प्रतिनिधी असून त्यांनी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून सपोनि मिथुन भोईर यांनी पंचांसमक्ष राजेश दादवानी यांच्या भिवंडीतील तीन बत्ती परिसरातील मिर्कल मॉल समोरील रॉयल वॉच अँड इलेक्ट्रिक या घड्याळाच्या दुकानात राजेशने दुकानात तब्बल ३ लाख ५ हजार ६०० रुपये किमतीचे टायटन, फास्टट्रॅक याप्रमाणे विविध नामांकित ब्रँडेड कंपन्यांचे हुबेहूब नक्कल व रंगसंगती असलेली घड्याळे कोणत्याही स्वामित्व हक्काचा कायदेशीर अधिकार नसताना बेकायदेशीर पणे साठा करून विक्रीसाठी ठेवल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे.याप्रकरणी राजेशच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात प्रतीलीपी अिधिकाराचे अधिनियम सन १९५७, कलम ५१, ६३, अधिनियम १९९९ कलम, १०३, १०४, प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# ‘मोगऱ्यासारखं गाल’ हे आगरी गाणं भिवंडीच्या ट्राफिकमुळे पुन्हा एकदा वायरल

**भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी**

२०१८ साली युवासाहित्यिक व संगीतकार सर्वेश तरे यांनी लिहिलेलं आणि संगीतबद्ध केलेलं प्रसिद्ध आगरी गाणं ‘मोगऱ्यासारखं गाल’ पुन्हा एकदा सोशल मीडियावर ट्रेन्डिंगमध्ये आले आहे. तब्बल ३३०० हून अधिक नव्या युजर्सनी यावर रील्स तयार केल्या असून, इन्स्टाग्रामवरील लोकप्रिय कलाकार पायल पाटील, बंटी म्हात्रे यांच्यासह अनेकांनी या गाण्यावर व्हिडीओ बनवले आहेत.या गीताने २०१८ मध्ये GANA.COM च्या मराठी टॉप ५ हिट गाण्यांमध्ये स्थान मिळवले होते. सध्या, तब्बल सात वर्षांनंतर हे गाणं पुन्हा एकदा जनमानसात लोकप्रिय झालं आहे आणि भिवंडीतील ट्राफिक समस्येमुळे ते आणखीनच चर्चेत आलं आहे.

# दोन अल्पवयीनांचे अपहरण

**भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी**

शहरातील शांतीनगर पोलिस ठाणे हद्दीतील दोन वेगवेगळ्या भागातील एका १७ वर्षीय मुलीचे तर एका १२ वर्षीय मुलाचे अपहरण झाल्याच्या घटना घडल्या आहेत.यातील पहिल्या घटनेत वैष्णवी गोपाल बनसोड (१७) ही टेमघर येथील मातोश्री निवास मध्ये राहत असून ती गुरुवारी दुपारी १२ ते १ वाजेच्या दरम्यान घराबाहेर गेली असता घरी परतलीच नसल्याने तिची आई विमल गोपाल बनसोड (३७) यांच्या फिर्यादीवरून शांतीनगर पोलिस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.तर दुसऱ्या घटनेत गुलजार नगर येथील रुकसार अपार्टमेंट मध्ये राहणारा अयान अरशद खान (१२) हा १९ जून रोजी सायंकाळी साडे सहा वाजता दुकानात किराणा सामान आणण्याकरिता गेला असता तो घरी परतलाच नसल्याने त्याचे कोणीतरी फूस लावून अपहरण केल्याच्या संशयावरून सबा परविन अरशद खान (३३) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाच्या विरोधात शांतीनगर पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

